N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** धाराशिव **P.S.(ठाणे):** तुळजापूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0280 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/06/2024 20:59

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 26/06/2024
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/06/2024
**Time From (वेळेपासून):** 15:27 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:27 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/06/2024 **Time (वेळ):** 20:49 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 039
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/06/2024 20:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** शिवाजी चौक, तुळजापुर येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): रमेश नवनाथ सारुक

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1982

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा नांदगाव, ता वाशी, जिधारा,तुळजापूर,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा नांदगाव, ता वाशी, जिधारा,तुळजापूर,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8010377782

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रकाश नामदेव चाफेकर | | | 1. रा तांबरी विभाग, धाराशिव,, तुळजापूर,धाराशिव,महाराष्ट्र, भारत |
| 2 | महेश जालिंदर सांगळे | | | 1. रा आदर्शकलनी, धाराशिव,, तुळजापूर,धाराशिव,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पंधराहजार रुपये | 15,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी रमेश नवनाथ सारुक , वय 42 वर्ष, व्यवसाय शेती, रा.नांदगाव, ता.वाशी, जि.धाराशिव. मोबाईल नंबर 8010377782

मी दिनांक 24.06.2024 रोजी उपळापाटी, येरमाळा येथे पोनि राठोड साहेब यांचे समक्ष हजर येऊन तक्रार दिली होती की, पोलीस ठाणे येरमाळा येथे माझा भाऊ जयराम सारुक याचेविरुध्द पोलीस ठाणे, येरमाळा गुरनं 123/2024 कलम 279, 304 ब, 337, 338 भादंवि अन्वये दिनांक 30.04.20241 रोजी दाखल आहे. सदर दाखल गुन्ह्यामध्ये माझी पत्नी नामे बबिता रमेश सारुक हिचे नावे असलेलासोनालिका कंपनीचा ट्रॅक्टर पोलीस स्टेशन येरमाळा येथे जमा करण्यात आलेला आहे. सदरचा ट्रॅक्टर मला परत देण्यासाठी तपास अंमलदार चाफेकर साहेब व त्यांचे मित्र सांगळे साहेब हे माझेकडे 15000/- रुपये मागत असुन त्यावरुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी म्हणुन तक्रार दिली होती.

सदर तक्रारीवरुन दि.24.06.2024 रोजी पोलीस निरीक्षक राठोड साहेब यांनी प्रथम चाफेकर साहेब हे माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत मला व पंच क्र. 1 लोखंडे यांना योग्य त्या सुचना देऊन पोलीस ठाणे येरमाळा येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर लाचमागणी पडताळणी पुर्व कार्यवाही केली. त्यानंतर माझेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दिल्यानंतर मी व पंच क्रं.01 असे माझेकडील मोटारसायकलवरुन पोलीस ठाणे येरमाळा येथे जावुन चाफेकर साहेब यांना भेटलो. सदर लाचमागणी पडताळणीमध्ये चाफेकर साहेब व माझेत कामाचे अनुषंगाने बोलणे झाले. तेव्हा चाफेकर साहेब यांनी त्यांचे मोबाईल वरुन सांगळे साहेब यांना फोन करुन मला बोलण्यास फोन दिला. तेव्हा सांगळे साहेब यांनी माझेकडे चाफेकर साहेब यांना देण्यासाठी 15000/- रुपयाची मागणी केली, परंतु मोबाईलचा स्पिकर ऑफ असल्याने सांगळे साहेब यांचे बोलणे रेकॉर्ड झाले नाही. त्यानंतर चाफेकर साहेब यांनी मला सांगळे साहेब यांची भेट घेणे बाबत सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन दिनांक 24.06.2024 रोजी धाराशिव येथे येवुन सांगळे साहेब हे माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सांगळे साहेब यांना भेटण्यासाठी मी सांगळे साहेब यांना धाराशिव बसस्टॅंड येथुन फोन केला असता त्यांनी मला बसस्टॅंडलाच थांबा मी येतो असे म्हणाले. त्यानंतर पोनि राठोड यांनी मला व पंच क्र. 1 लोखंडे यांना योग्य त्या सुचना देऊन माझेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दिल्यानंतर मी व पंच क्रं.01 असे बसस्टॅंडमध्ये पायी चालत जावुन सांगळे साहेब यांना भेटलो. सदर लाचमागणी पडताळणी कारवाईमध्ये सांगळे साहेब यांनी पोलीस ठाणे येरमाळा येथील गुन्ह्यात जमा असलेला ट्रॅक्टर मला परत देण्यासाठी चाफेकर साहेब यांचेसाठी 15000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले व सदरची लाच रक्कम परवा दिवशी घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. सदर कारवाईचा सविस्तर लाचमागणी पडताळणी पंचनामा ü करण्यात आला आहे.

त्यानंतर आज दिनांक 26.06.2024 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, धाराशिव येथे येवुन राठोड साहेब यांची भेट घेतली व त्यांना आज रोजी मी सांगळे साहेब यांनी पैसे घेवुन बोलविल्याने त्यांची भेट घेवुन त्यांना पैसे देणार असल्याचे तसेच माझेकडे 15000/- रुपये उपलबध असुन 15000/- रुपये सांगळे साहेब यांना देणार असल्याचे सांगितले. त्यावरुन पोनि राठोड यांनी सापळा आजमावणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पो.नि. राठोड साहेब यांनी दोन पंचासमक्ष मला व पंचाना अँथ्रासिन पावडरचा व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग समजावुन सांगुन, त्याचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. त्यानंतर सापळा पुर्व कारवाई करण्यात आली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना



Scanned with CamScanner

अँथ्रासिन पावडर लावुन, सदरच्या नोटा माझ्या पँटच्या उजव्या खिशात ठेवल्या व पोनि राठोड साहेब यांनी मला सांगळे साहेब यांनी स्वत: किंवा इतरामार्फत लाच रक्कम स्विकारल्यानंतरचा करावयाचा इशारा नेमुन दिला. त्यानंतर सांगळे साहेब यांना फोन करुन भेट कोठे होईल याबाबत विचारले असता त्यांनी ते तुळजापुरला असुन धाराशिवला येणार असले बाबत सांगितले. परंतु बराच वेळ वाट पाहुन देखील ते न आल्याने सांगळे साहेब यांना पुन्हा फोन केला असता त्यांनी शिवाजी चौक, तुळजापुर येथे भेटण्यासाठी बोलविले.त्यानंतर राठोड साहेब यांनी तुळजापुर येथे सापळा आजमावणार असल्याचे सांगितले. त्यावरुन मी, पंच, पोनि राठोड साहेब व सापळा पथक असे खाजगी चारचाकी वाहनाने तुळजापुर - लातुर बायपास रोड, तुळजापुर येथे गेलो. तेथे सुरक्षित ठिकाणावरुन पोनि राठोड साहेब यांनी योग्य त्यास सुचना देवुन माझेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दिले. त्यानंतर मला व पंच क्र.1 यांना सांगळे साहेब यांची भेट घेण्यासाठी शिवनेरी हॉटेल, शिवाजी चौक, तुळजापुर येथे माझेकडील मोटार सायकलवरुन रवाना करण्यात आले. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र. 2 असे रवाना झाले. मी व पंच क्रमांक 1 असे माझेकडील मोटार सायकलवरुन शिवनेरी हॉटेलमध्ये गेलो. तेथे सांगळे साहेब हे हजर होते. तेथे सांगळे साहेब यांच्या सोबत माझ्या कामाविषयी चर्चा झाली. त्यानंतर आम्ही हॉटेलच्या बाहेर आलोत. त्यावेळी सांगळे साहेब यांनी हाताने इशारा करुन लाच रक्कम स्विकारण्यास समंती दिली त्यावेळी मी अँथ्रासिन पावडरयुक्त 15000/- रुपये सांगळे साहेब यांना दिले. त्यावेळी सांगळे साहेब यांनी ती रक्कम घेवुन हाताने मोजत असताना मी मला लाच रक्कम स्विकारल्यानंतर नेमुन दिलेला डावा हात डोक्यावरुन फिरवुन इशारा केला. ती वेळ साधारणत: 15.27 वा. चे सुमारासची होती. इशारा प्राप्त होताच सांगळे साहेब हे नोटा मोजत असतानाच पो.नि. राठोड साहेब, पंच क्र.2 व सापळा पथक हे तात्काळ घटनास्थळी हजर आले. त्यावेळी पोलीस अंमलदार बेळे यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. तेव्हा पो.नि. राठोड साहेब यांनी पंच क्र.1 यांना विचारणा केली. मला कोणी लाचेची मागणी करुन लाच रक्कम कोणी स्विकारली. तेव्हा पंच क्र. 1 यांनी सांगळे यांचेकडे हाताने इशारा करुन सांगितले की, तक्रारदार यांचेकडे सांगळे साहेब यांनी लाचेची मागणी करुन, ती लाच रक्कम त्यांनी स्वत: स्विकारली आहे. त्यानंतर पो.नि.राठोड साहेब यांनी सांगळे साहेब यांना ताब्यात घेवुन स्वत:चा परिचय दिला. त्यानंतर सांगळे यांना त्यांचे नाव व गाव विचारले असता, सांगळे यांनी त्यांचे नाव महेश जालिंदर सांगळे, वय 37 वर्ष, पद- चालक पोलीस नाईक 1629, नेमणुक - उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, तुळजापुर, रा. आदर्शकॉलनी, धाराशिव, मुळ रा.सोनेगाव, ता.जि.धाराशिव असे सांगितले. त्यानंतर सांगळे यांचेकडुन त्यांनी माझेकडुन स्विकारलेली अँथ्रासीन पावडरयुक्त लाच रक्कम 15000/- रुपये पंचासमक्ष ताब्यात घेतली. त्यानंतर तेथे पोनि राठोड व सापळा पथकाने पंचासमक्ष यशस्वी सापळा नंतरची पुढील कायदेशीर कारवाई केली. सदर कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी चाफेकर साहेब यांनी पोलीस ठाणे येरमाळा येथे माझे भावाचे नावे दाखल असलेल्या गुन्हयात पोलीस ठाणे येरमाळा येथे जमा करण्यात आलेला ट्रॅक्टर परत देण्यासाठी सांगळे साहेब यांचे मार्फतीने दिनांक 24.06.2024 रोजी माझेकडे 15000/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम आज दिनांक 26.06.2024 रोजी सापळा कारवाई दरम्यान माझेकडुन शिवाजी चौक, तुळजापुर येथे 15000/- रुपये पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्यामुळे माझी 1.प्रकाश नामदेव चाफेकर, पोहेकॉ, नेमणुक - पोलीस ठाणे, येरमाळा, रा.तांबरी विभाग, धाराशिव, 2. महेश जालिंदर सांगळे, वय 37 वर्ष, पद- चालक पोलीस नाईक 1629, नेमणुक - उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, तुळजापुर, रा.आदर्शकॉलनी, धाराशिव, मुळ रा.सोनेगाव, ता.जि.धाराशिव यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत करुन, त्यांची प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली, ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAVINDRA PANDURANG KHANDEKAR(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAVINDRA PANDUR/

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

पोलीस ठाणे,अमलदार
पोलीस स्टेशन,तुळजापूर



Scanned with CamScanner